नोंदणी तारीख :– 03/02/2012
दाखल तारीख :– 06/02/2012
निकाल तारीख :– 25/01/2016
कालावधी :– 03 व 11 म.12दि.

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, यांचे न्यायालय, पुर्णा, जिल्हा परभणी.**
( पिठासीन अधिकारी श्री. अजय द. पुंडलीक)

**नियमित दिवाणी मुकदमा नं. 36/2012** **निशाणी कमांक :–62**

1. विठ्ठल पि. लक्ष्मणराव मोगले,
   वय 60 वर्ष, धंदा शेती,
   रा. गौर,ता. पुर्णा, जिल्हा परभणी.

2. मारोती पि. पि. लक्ष्मणराव मोगले,
   वय 55 वर्ष, धंदा शेती,
   रा. गौर,ता. पुर्णा, जिल्हा परभणी. .... **वादी**

– विरूध्द –

मधुकर पि. बापूराव पारवे.
वय 50 वर्ष धंदा, शेती,
रा. गौर,ता. पुर्णा, जिल्हा परभणी.
... **प्रतिवादी.**

सदरचा दावा अतिक्रमण केलेल्या जमीनीचा ताबा मिळण्यासाठी
व दरम्यानचे उत्पन्न मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे.

(दाव्याचे मुल्याकंन रूपये 1000/व कोर्ट फी रूपये 200/)

वादीतर्फे वकिल श्री वाय.एस.डाखोरे
प्रतिवादीतर्फे वकिल श्री एम.टी.पारवे.

**न्यायनिर्णय**
( दिनांक 25/01/2016 रोजी जाहीर केला.)

सदरचा दावा अतिक्रमण केलेल्या जमीनीचा ताबा मिळण्यासाठी व दरम्यानचे उत्पन्न मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे.

02. दाव्याची थोडक्यात हकीकत येणेप्रमाणे.

वादी क्र. 1 दावा मिळकत गट क्र. 119 मौजे गौर क्षेत्रफळ 3 हेक्टर पोटखराब 10 आर चा मालक आहे व वादी क्र. 2 गट क्र. 119 मौजे गौर क्षेत्र 1 हेक्टर 42 आर पोटखराब 9 आर या शेताचा मालक आहे. वादी क्र. 1 व 2 हे भाऊ आहे व दावा

मिळकती वादींच्या ताब्यात आहे. प्रतिवादीचा दावा मिळकतीशी काही संबंध नाही. प्रतिवादीचा शेत गट क्र. 117 व दावा मिळकत गट क्र. 119 यांच्यामध्ये पुर्व पश्चिम धुरा आहे व प्रतिवादी सदर धुरा फोडुन अतिक्रमण करीत आहे. वादींच्या वहीवाटीतील क्षेत्र कमी झाल्याचे वादींच्या लक्षात आल्यानंतर गट क्र. 119 ची मोजणी तालुका निरिक्षक भुमीअभिलेख कार्यालय पुर्णा यांच्या मार्फत दिनांक 31.10.2011 रोजी मोजणी करून घेतली आहे व मोजणीदाराने प्रतिवादीला व आजुबाजुच्या शेतक–यांना मोजणीच्या नोटीस दिल्या होत्या व मोजणी अधिकारी यांनी गट क्र. 119 ची मोक्यावर जावुन मोजणी केली आहे, त्यावेळी प्रतिवादी हजर होता. सदर मोजणीमध्ये गट क्र. 117 मधील धारकाने गट क्र. 119 च्या 4 आर क्षेत्रावर बेकायदेशिरपणे अतिक्रमण केल्याचे सदर मोजणीमध्ये निष्पन्न झाले आहे. सदर क्षेत्र वादी क्र. 1 च्या क्षेत्राचा पश्चिम बाजुकडुन आहे व वादी क्र. 2 च्या क्षेत्राचा पुर्व बाजुकडुन आहे. प्रतिवादी याचे शेत वादी क्र. 1 व 2 च्या शेताच्या उत्तरेकडुन आहे. वादी क्र. 1 च्या क्षेत्रफळावर 3 आर अतिक्रमण व वादी क्र. 2 च्या क्षेत्रफळावर 1 आर अतिक्रमण प्रतिवादी यांनी केलेले असल्याचे मोजणी मध्ये निष्पन्न झाले आहे. सदर मोजणीचा क्रमांक मोर/क/960/11 असा आहे. वादींना मोजनी नकाशाची 'क' प्रत कार्यालयाने दिलेली आहे. मोजणी कायदेशिर झालेली आहे. मोजणी नकाशामध्ये अतिक्रमण केलेले क्षेत्र लाल रंगाने दर्शविलेले आहे.

प्रतिवादीने अतिक्रमण केलेली 4 आर जमीन भारीची व सुपीक जमीन आहे. प्रतिवादीला अतिक्रमीणीत जमीनीपासुन रू. 10,000/– उत्पन्न होते, म्हणुन अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळेपर्यंत दरम्यानचा खर्च प्रतिवर्ष दहा हजार प्रमाणे प्रतिवादीकडुन मिळावा म्हणुन विनंती केलेली आहे.

मोजणीनंतर वादींनी प्रतिवादीला अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मागीतला असता प्रतिवादीने दिलेला नाही, म्हणुन वादींनी दिनांक 22.12.2011 रोजी प्रतिवादीला नोटीस पाठविली होती ती त्याला तामील झालेली आहे, तरी देखील ताबा देण्यात आलेला नाही. तसेच दरम्यानचा खर्च देखील दिलेला नाही. म्हणुन प्रार्थनेप्रमाणे दावा मंजुर करण्याची विनंती केली आहे.

03. प्रतिवादी याने नि. 13 प्रमाणे लेखी जबाब दाखल केला आहे व वादीने केलेले कथन नाकारलेले आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्या शेतामध्ये धुरा आहे, हे देखील नाकारले आहे व त्याने अतिक्रमण केल्याचे देखील नाकारले आहे. वादींनी दिलेल्या नोटीसचे उत्तर प्रतिवादीने दिलेले आहे व नोटीसच्या उत्तरामध्ये गावातील प्रतिष्ठीत नागरीकांच्या समक्ष दोघांच्या सहमतीने नाला काढण्याचे बोलुन दाखवले व आपसात वाद मिटवुन घेण्याचे

सांगीतले आहे व अधिकच्या कथनामध्ये असे म्हटले आहे की, प्रतिवादीने 4 आर जमीनीवर अतिक्रमण केलेले नाही व कोणताही सामाईक धुरा फोडलेला नाही. वादी यांनीच प्रतिवादीच्या शेतावर सामाईक धुरा फोडुन अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला आहे. गावातील प्रतिष्टीत नागरीक बोलावुन वादी व प्रतिवादी यांच्या शेताच्यामध्ये नाला काढावा असे त्यांनी सुचविले होते, परंतु वादींनी ते ऐकले नाही. प्रतिवादी शेतांच्यामध्ये नाला काढण्यास तयार आहे. वादींनी प्रतिवादी विरूध्द खोटा दावा केला आहे, म्हणुन दावा खारीज करण्याची विनंती केली आहे.

04. माझे पुर्व अधिकारी यांनी नि. 14 प्रमाणे वादी व प्रतिवादी यांनी केलेल्या कथनावरून व दाखल कागदपत्रावरून खालील मुद्दे काढण्यात आलेले आहे, त्यांच्या निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे देत आहे.

| | **मुददे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| 1 | वादी हे सिध्द करू शकले काय की प्रतिवादी याने गट क. 119 वर 4 आर जमीनीचे अतिक्रमण केले आहे ? | होय |
| 2. | वादी हे सिध्द करू शकले काय की, वादी 4 आर अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळण्यास पात्र आहे.? | होय |
| 3. | वादी मागणी प्रमाणे दरम्याचे उत्पन्न मिळण्यास पात्र आहे का ? | नाही |
| 4. | अंतिम आदेश व हुकूमनामा ? | दावा अंशतः मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

05. वादी क. 1 ने त्याचा पुरावा नि. 16 प्रमाणे दिला आहे. नि. 4 सोबत दाखल दावा मिळकतीच्या 7/12 ला नि. 06, प्रतिवादीच्या शेताच्या 7/12 ला नि. 07 देण्यात आली आहे व वादीतर्फे साक्षीदार क. 2 मोजणी अधिकारी श्री पल्लेवाड यांचा पुरावा नि. 24 प्रमाणे देण्यात आला आहे. त्यांच्या पुराव्या दरम्यान मोजणी नकाशाच्या 'क' प्रतिला नि. 25 देण्यात आली आहे. वादीतर्फे साक्षीदार क. 3 केशवराव पारवे यांचा पुरावा नि. 29 प्रमाणे देण्यात आला आहे.

06. प्रतिवादी याने त्याचा पुरावा नि. 33 प्रमाणे दिला आहे. प्रतिवादीतर्फे साक्षीदार क. 2 नाना पारवे याचा पुरावा नि. 48 प्रमाणे देण्यात आला आहे व साक्षीदार क. 3 किशन जोगदंड याचा पुरावा नि. 49 प्रमाणे देण्यात आला आहे व साक्षीदार क. 4 मोजणी अधिकारी

तनुजा देशपांडे हिचा पुरावा नि. 54 प्रमाणे देण्यात आला आहे, त्यांनी केलेल्या मोजणी नकाशाच्या 'क' प्रतिला नि. 55 देण्यात आली आहे व साक्षीदार क्र. 5 बाबाराव वाघमारे याचा पुरावा नि. 57 प्रमाणे देण्यात आला आहे.

**<u>मुद्दा क्र.1 व 2 करिता :–</u>**

07. मुद्दा क्र. 1 व 2 एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांच्या निष्कर्षांच्या कारणाचा विचार एकत्र करण्यात आला आहे.

08. वादी क्र. 1 ने दाव्याप्रमाणे त्याच्या पुराव्या दरम्यान मजकुर सांगीतलेला आहे, तसेच प्रतिवादी याने गट क्र. 119 वर 4 आर जमीनीचे अतिक्रमण केले आहे व सदर अतिक्रमण मोजणी क्र. मोर/क/960/11 या नुसार निष्पन्न झाले आहे व प्रतिवादी याला अतिक्रमणीत जमीनीची मागणी वादीने केली असता वादीने जमीन दिलेली नाही. असे सांगीतलेले आहे. प्रतिवादीतर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासाचे वाचन केले असता, वादीला देण्यात आलेल्या सुचना त्याने नाकारलेल्या आहे, तसेच त्याने उलट तपासादरम्यान एकही महत्वाची कबुली दिलेली नाही. तसेच त्याला उलट तपसामध्ये प्रतिवादीने 4 आर जमीनीचे अतिक्रमण केले नाही, अशी सुचना देखील देण्यात आली नाही.

09. वादीचा साक्षीदार क्र. 2 मोजणी अधिकारी दिनेश पल्लेवार याने त्याच्या पुराव्यात असे सांगीतले आहे की, वादी क्र.1 याने त्यांच्या कार्यालयात गट क्र. 119 मोजणीसाठी अर्ज केला होता व कार्यालयाने त्यांना दिनांक 02.09.2011 रोजी मोजणीबाबत आदेश दिले होते व त्यानुसार त्यांनी संबंधीत शेत शेजा–यांना दिनांक 31.10.2011 रोजी मोजणी करण्याबाबत नोटीस पाठविली होती व मोक्यावर जावुन मोजणी केल्याचे सांगीतले आहे व मोजणी फलक यंत्राच्या सहयाने मोजणी केल्याचे सांगीतले आहे. तसेच मोजणीचा 'अ' नकाशा तयार केला व संबंधीत गटाचा अभिलेखावरून मोजणीचा नकाश ईमपोज केला आणि जागेवर हद्दी खुना दाखवल्या व मोजणीप्रमाणे पंचनामा केला, मोजणीमध्ये गट क्र. 119 मध्ये कमी पडलेले क्षेत्र 4 गुंठे गट क्र. 117 कडे निघाल्याचे निष्पन्न झाले आहे व नि. 25 मोजणी नकाशाच्या 'क' प्रतिमधील मजकुर कार्यालयाच्या 'अ' प्रति प्रमाणे बरोबर असल्याचे मान्य केले आहे व गट क्र. 117 हा गट क्र. 119 च्या उत्तरेकडील बाजुस आहे, असे सांगीतले आहे. उलट तपासामध्ये त्याने हे मान्य केले आहे की गट क्र. 117 आणि 119 यांच्यामध्ये असणारा भाग पश्चिम टोक ते पुर्व टोक एक समान आहे, तसेच दोन्ही टोकांना हद्दी निश्चित केल्या व गट क्र. 119 ची दोन्ही टोकांची हद्द अभिलेखा प्रमाणे बरोबर आहे, असे सांगतो, परंतु गट क्र. 119 व 117 मधील हद्द अभिलेखा प्रमाणे आणि वहीवाटी प्रमाणे सरळ असल्याचे त्याने नाकारले आहे. तसेच पंचनाम्यावर लगत शेतक–याच्या सहया घेतल्या

नाही, हे मान्य केले आहे व इतर बचाव सुचना त्याने पुर्णपणे नाकारलेल्या आहे.

10. वादीतर्फे साक्षीदार क्र. 3 केशवराव पारवे याने त्याच्या पुराव्यामध्ये तो वादी व प्रतिवादी यांना ओळखत असल्याचे सांगीतले आहे, तसेच प्रतिवादीची शेती वादीच्या शेताच्या उत्तरेकडुन असल्याचे सांगीतले आहे व दिनांक 31.10.2011 रोजी गट क्र. 119 ची मोजणी त्याच्या समक्ष झाली होती व तो पंच म्हणुन हजर होता असे सांगीतले आहे, तसेच त्याने पंचनाम्यावर सही केल्याचे सांगीतले आहे व मोजणीमध्ये वादीचा गट क्र. 119 ची 4 आर जमीन प्रतिवादीचा गट क्र. 117 मध्ये वहीवाटीत निघाली असे सांगीतले आहे. उलट तपासामध्ये दावा मिळकतीच्या शेजारी त्याची जमीन नाही, हे मान्य करतो व वादी व प्रतिवादी यांच्या शेतांच्यामध्ये असना–या धु–याची लांबी अंदाजे 1200 फुट असेल असे सांगतो. तसेच वादी व प्रतिवादी यांचा पुर्व पश्चिम धुरा सरळ दिशेत आहे, हे मान्य केले आहे. परंतु, सध्या पुर्व पश्चिम धुरा सरळ दिशेत असल्याचे त्याने नाकारले आहे. तसेच प्रतिवादीतर्फे देण्यात आलेल्या इतर बचाव सुचना त्याने नाकारल्या आहे.

11. प्रतिवादीने त्याचा पुरावा त्याच्या लेखी जबाबाप्रमाणे दिला आहे व त्याने अतिक्रमण केले नाही, असे सांगीतले आहे. तसेच मोजणी त्याच्या समक्ष झालेली नाही व लेखी जबाबामध्ये नमुद अधिकच्या कथनाप्रमाणे पुराव्यामध्ये मजकुर सांगीतलेला आहे. उलट तपासामध्ये त्याने हे मान्य केले आहे की, दावा मिळकतीच्या उत्तरेकडील बाजुस त्याची शेती आहे व वादीच्या व त्याच्या जमीनीच्या मधुन चारी अथवा वळन काढलेले नाही. तसेच त्याने गट क्र. 117 ची मोजणी केलेली नाही. वादीने मोजणी केली आहे व तो मोजणीला हजर होता व ती मोजणी बरोबर केली आहे हे मान्य केले आहे. तसेच वादीने केलेल्या मोजणी विरूध्द त्याने वरिष्ठ कार्यालयात तक्रार अथवा उजर दाखल केली नाही, हे मान्य केले आहे.

12. प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. 2 नाना पारवे याने त्याच्या पुराव्यात असे सांगीतले आहे, तो वादी व प्रतिवादींना ओळखतो व त्यांच्यामध्ये सामाईक धु–यामध्ये वाद चालु आहे, तसेच प्रतिवादी याने गट क्र. 117 ची मोजणी दिनांक 21.01.2015 रोजी केली असुन ती मोजणी, मोजणी अधिकारी देशपांडे मॅडम यांनी केलेली आहे. त्यावेळी वादी क्र. 1 गैरहजर होता व वादी क्र. 2 हजर होता. मोजणीमध्ये गट क्र. 119 ने गट क्र. 117 मधील 6 आर जमीनीवर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले होते, असे सांगीतले आहे. उलट तपसामध्ये त्याने हे मान्य केले आहे की, त्याच्या शपथपत्रातील मजकुर त्याच्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आलेला नाही व प्रतिवादीच्या सांगण्यावरून पुरावा देण्यात आला आहे, हे मान्य केले आहे व मोजणीदाराने गट क्र. 117 मोजल्याचे सांगीतले आहे.

13. प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. 3 किशन जोगदंड याने देखील प्रतिवादीचा साक्षीदार क्र. 2 प्रमाणे साक्ष दिली असुन त्याने मोजणी पंचनाम्यावर सही केल्याचे सांगीतले आहे व मोजणी त्याच्या समक्ष झाल्याचे सांगीतले आहे. उलट तपासामध्ये त्याने हे मान्य केले आहे की त्याच्या शपथपत्रातील मजकुर त्याला वाचुन दाखविला नाही व त्याला लिहिता वाचता येत नाही, तसेच त्याच्या शपथपत्रात काय मजकुर लिहीला आहे हे त्याला सांगता येत नाही. तसेच मोजणीदाराने कोणते गट लिहीले व काय लिहीले हे त्याला सांगता येत नाही.

14. प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. 4 मोजणी अधिकारी तनुजा देशपांडे हिने तिच्या पुराव्यात असे सांगीतले आहे की प्रविादीने त्यांच्या कार्यालयात मोजणी साठी अर्ज केला होता व दिनांक 21.01.2015 रोजी गट क्र. 117 ची त्यांनी मोजणी केली त्यावेळी मोजणीमध्ये गट क्र. 119 च्या धारकाने गट क्र. 117 तील भागात दिसुन येतो व मोजणी नकाशा नि. 55 प्रमाणे असल्याचे सांगीतले आहे. उलट तपसामध्ये गट क्र. 117 चा सर्वे क्रमांक 52 आहे व गट क्र. 119 चा सर्वे क्रमांक माहीत नाही, सर्वे क्र. 52 चे गट क्र. 114, 115, 116, व 117 मध्ये विभागणी झाली आहे. मोजणीच्या वेळी गट क्र. 115 व 116 व 117 ची मोजणी केली. गट क्र. 119 ची मोजणी केली नाही, हे मान्य केले आहे. मोजणी नकाशामध्ये विहीर दर्शविली नाही. तसेच गट क्र. 117 मध्ये त्यांच्याबाजुने रस्ता आहे व रस्त्याचे क्षेत्रफळ नकाशात दर्शविले नाही, हे मान्य केले आहे व इतर वादीतर्फे देण्यात आलेल्या सुचना तिने नाकारल्या आहे.

15. प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. 5 बाबाराव वाघमारे याने प्रतिवादीचे साक्षीदार क्र. 2 व 3 यांच्या प्रमाणे पुरावा दिला आहे व उलट तपासामध्ये हे मान्य केले आहे की, वादीने त्याचा गट क्र. 119 मोजला होता, व प्रतिवादीने वादीच्या 4 आर जमीनीवर अतिक्रमण केल्याचे निघाले होते, तेंव्हापासुन वादी व प्रतिवादीमध्ये वाद आहे. तसेच गट क्र. 117 चे निश्चित क्षेत्र किती आहे हे त्यांना माहीत नाही. तसेच मोजणी अधिका—याने मोजणी केंव्हा, कशी कोणत्या गटाची केली हे त्याला सांगता येत नाही. तसेच त्याने 6 आर अतिक्रमणाचे कागदपत्रे पाहुण खात्री केली नाही. तसेच त्याने मोजणीचा नकाशा पाहीलेला नाही, हे मान्य केले आहे व इतर सुचना नाकारलेल्या आहे.

16. वादीने दाखल केलेल्या नि.06 च्या 7/12 चे वाचन केले त्यानुसार वादी दावा मिळकतीचे भोगवटदार म्हणुन गाव नमुना 7 मध्ये वादींच्या नावाने नोंद आहे. तसेच वादी सदर जमीनीमध्ये विवीध पिके घेत असल्याबाबतची नोंद गाव नमुना 12 मध्ये आहे. प्रतिवादीतर्फे वादीच्या मालकी हक्काबाबत स्पष्टपणे नाकारलेले नाही व अप्रत्यक्षपणे वादींचा

मालकी हक्क गट क्र. 119 (दावा मिळकत) बाबतीत मान्य केलेला आहे. वादी व वादीच्या साक्षीदाराने देखील दावा मिळकत शेती वादींच्या मालकीची व ताब्यात असल्याबाबत पुराव्यामध्ये सांगीतलेले आहे व त्या पुराव्याचे खंडण प्रतिवादीतर्फे घेतलेल्या उलट तपासादरम्यान झालेले नाही. त्यामुळे वादी दावा मिळतीचे म्हणजेच गट क्र. 119 चे दावा मिळकत क्षेत्राचे मालक असल्याचे सिध्द होते.

17. तसेच वादीतर्फे दाखल प्रतिवादीचा गट क्र. 117 च्या 7/12 चे वाचन करण्यात आले. त्यामध्ये प्रतिवादीच्या नावे 1 हेक्टर 22 आर ऐवढी जमीन गाव नमुना 7 मध्ये भोगवटदार म्हणुन नमुद आहे व प्रतिवादी त्यामध्ये पिक घेत असल्याबाबतची नोंद गाव नमुना 12 मध्ये नमुद आहे. वादीनुसार प्रतिवादी वरील मिळकतीचा मालक आहे व प्रतिवादीची शेती वादींच्या शेताच्या उत्तरेकडुन लागुन असल्याचे वादींचे म्हणने आहे. प्रतिवादीने त्याच्या लेखी जबाबात वरील जमीन त्याच्या मालकीची असल्याचे मान्य केलेले आहे व वादी व त्याच्या साक्षीदाराने त्यांच्या पुराव्या दरम्यान प्रतिवादीचा शेत गट क्र. 117 असल्याचे सांगीतलेले आहे व प्रतिवादीने देखील त्याच्या पुराव्यामध्ये त्याच्या ताब्यात गट क्र. 117 चे वरील क्षेत्र असल्याचे सांगीतलेले आहे. तसेच दोन्ही पक्षांना एकमेकांचा मालकी हक्क व ताबा मान्य असल्यामुळे प्रतिवादी गट क्र. 117 मधील 1 हेक्टर 22 आर ऐवढया क्षेत्राचा मालक व ताबेदार आहे, हे सिध्द होते.

18. वादीतर्फे दाखल मोजणी नकाशा नि. 25 चे वाचन करण्यात आले. सदर मोजणी दिनांक 31.10.2011 रोजी मोजणी क्रमांक मोर/क/960/11, नुसार गट क्र. 117 व 119 ची मोजणी अधिका–याने केलेली आहे व मोजणीच्या वेळी पंच हजर असल्याबाबत त्यामध्ये नमुद आहे. तसेच दावा मिळकत गट क्र. 119 चे 0.04 ऐवढे क्षेत्र गट क्र. 117 च्या वहिवाटीत असल्याचे त्यामध्ये नमुद आहे व ते क्षेत्र लाल रंगाने नकाशामध्ये दर्शविलेले आहे. या मोजणी नकाशाला वादीचा साक्षीदार क्र. 2 मोजणी अधिकारी याचा पुरक पुरावा आहे व त्याने त्याच्या पुराव्यामध्ये नकाशा प्रमाणे मजकुर सांगीतलेला आहे. त्याने त्याच्या उलट तपासामध्ये एकही महत्वाची कबुली दिलेली नाही, जेने करून मोजणी नकाशा चुकीचा आहे, असे म्हणता येईल तसेच वादीचा साक्षीदार क्र. 3 हा मोजणी नकशावरील पंच आहे व त्याने देखील मोजणी नकाशा नि. 25 ला पुरक असा पुरावा दिलेला आहे व तो मोजणीच्या वेळी हजर होता, तसेच त्याच्या उलट तपासामध्ये त्याने एकही महत्वाची कबुली दिलेली नाही. तसेच वादीने देखील त्याच्या पुराव्यामध्ये मोजणी नकाशाला पुरक असा पुरावा दिलेला आहे व उलट तपसामध्ये मोजणी बाबत शंका उपस्थितीत होईल अशी एकही कबुली दिलेली नाही.

19. प्रतिवादी याने त्याच्या पुराव्यामध्ये त्याने अतिक्रमण केलेले नाही, असे जरी सांगीतले असले तरी उलट तपासामध्ये त्याची जमीन वादीच्या जमीनीच्या उत्तर बाजुने आहे व त्यांच्यामध्ये चारी अथवा वळन काढलेले नाही. तसेच वादींनी त्यांच्या गटाची मोजणी केली आहे हे मान्य केले आहे व तो मोजणीच्या वेळी हजर होता व झालेली मोजणी बरोबर झालेली आहे हे मान्य केलेले आहे. या महत्वाच्या उलट तपासामधील कबुलीचा विचार केला असता व वादी व वादीचे साक्षीदार यांनी दिलेल्या पुराव्याचा विचार केला असता, नि. 25 प्रमाणे झालेली मोजणी रितसर व कायदेशिर रित्या व योग्य प्रकारे झाली असल्याचे सिध्द होते.

20. प्रतिवादीने त्याच्या उलट तपासात मोजणी बरोबर झाली आहे हे मान्य केले आहे. त्यामुळे भारतीय पुराव्याचा कायदा 1872 च्या कलम 58 नुसार अतिरिक्त पुराव्याची गरज असल्याचे न्यायालयाला दिसुन येत नाही.

21. तसेच मोजणी नकाशा नि. 25 व त्याबाबतीत मोजणी अधिकारी वादीतर्फे साक्षीदार क्र. 2 यांचा साक्षीचा विचार केला असता, भारतीय पुरावा कायदा 1872 चे कलम 83 नुसार झालेली मोजणी योग्य प्रकारे कायदेशिर रित्या झालेली असल्याचे सिध्द होते व कलम 83 नुसार त्यास गृहीत धरण्यात आलेले आहे व झालेली मोजणी वादीने मोजणी अधिका–याची साक्ष घेवुन बरोबर असल्याचे सिध्द केलेले आहे. त्यामुळे भारतीय पुराव्याचा कायदा 1872 चा कलम 83 नुसार आवश्यक असलेल्या सर्वे बाबींची पुर्तता वादीतर्फे करण्यात आलेल्या आहे. तसेच भारतीय पुरावा कायदयाचे कलम 36 चा विचार केला असता, मोजणी मधील सर्व माहीती दावा निकाली काढण्यास गरजेची आहे.

22. प्रतिवादीतर्फे त्याच्या लेखी जबाबात व पुराव्यामध्ये त्याने अतिक्रमण केलेले नाही, असा बचाव घेतलेला आहे. परंतु पुढे दावा प्रलंबीत असतांना प्रतिवादीने त्याच्या गटाची मोजणी केली आहे. सदर मोजणी करून घेण्यासाठी प्रतिवादीने नि. 37 प्रमाणे न्यायालयात अर्ज केला होता व तो न्यायालयाने नामंजुर केलेला आहे, असे असतांना देखील प्रतिवादीने खाजगी मोजणी करून घेतली आहे व त्याचा मोजणी नकाशा नि. 55 प्रमाणे दाखल केला आहे व त्यासंबंधी पंच साक्षीदार व मोजणी अधिकारी यांची साक्ष घेतलेली आहे. परंतु, प्रतिवादीतर्फे त्याने केलेल्या मोजणी बाबत त्याच्या लेखी जबाबात काही कथन केलेले नाही व त्यामुळे प्रतिवादीतर्फे देण्यात आलेले साक्षीदार क्र. 2 ते 5 यांनी दिलेला पुरावा प्रतिवादीने त्याच्या लेखी जबाबात योग्य ती दुरूस्ती करून कथन केलेले नसल्यामुळे व सदर पुरावा कथनाबाहेरील असल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता 1908 च्या तरतुदीनुसार वाचता येणार नाही. त्यामुळे नि. 55 मोजणी नकाशा व प्रतिवादीने त्याने केलेल्या मोजणीसंबंधी दिलेला

पुरावा याचा परिनाम वादीच्या दाव्यावर वरील कारणावरून व वादीने केलेली मोजणी सिध्द झाली असल्यामुळे होतांना दिसुन येत नाही.

23. भारतीय पुराव्याचा कायदया 1872 चे कलम 101 व 103 नुसार वादीवर असलेली त्याची केस सिध्द करण्याची जबाबदारी वादीने पार पाडली आहे व मोजणी सिध्द करून प्रतिवादीने 0.04 आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे सिध्द केले आहे, तसेच भारतीय पुराव्याचा कायदा 1872 चे कलम 102 नुसार प्रतिवादीने अतिक्रमण केलेले नाही हि बाब सिध्द करण्याची जबाबदारी प्रतिवादींची असतांना देखील प्रतिवादीने दिलेल्या पुराव्यावरून सदर बाब प्रतिवादीने सिध्द केलेली नाही व वादी व वादीच्या साक्षीदारांच्या उलट तपासावरून सदर बाब सिध्द होत नाही. भारतीय पुराव्याचा कायदा 1872 चे कलम 61, 62, व 64 नुसार वादी व वादीच्या साक्षीदार मार्फत तसेच वरील सर्व कारणावरून मोजणी नकाशा नि. 25 सिध्द झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादीने वादींच्या गट क्र. 119 मधील उत्तरेकडुन 0.04 आर जमीनीवर अतिक्रमण केल्याचे सिध्द होते.

24. वादींनी दिनांक 22.12.2011 रोजी प्रतिवादीला वकीलामार्फत नोटीस पाठवुन अतिक्रमण केलेल्या जमीनीचा ताबा मागीतला होता, परंतु, नोटीस पाठवुन देखील प्रतिवादीने वादींना ताबा दिलेला नाही व नोटीसचे उत्तर पाठवुन बचाव घेण्याचा प्रयत्न केला होता परंतु, वरील कारणावरून प्रतिवादीचा बचाव नाकारण्यात आलेला आहे व वादींना प्रतिवादीने नोटीस मिळुन देखील ताबा दिलेला नाही.

25. प्रतिवादीने वादी क्र. 1 च्या मालकीच्या व ताब्यातील गट क्र. 119 मधील 0.03 आर उत्तरेकडील क्षेत्रावर व वादी क्र. 2 च्या 0.01 आर उत्तरेकडील क्षेत्रावर असे एकुण 0. 04 आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे वरील कारणावरून सिध्द झालेले असल्यामुळे वादी सदर क्षेत्राचा ताबा प्रतिवादीकडुन घेण्यास पात्र आहे. म्हणुन मुद्दा क्र. 1 व 2 चा निष्कर्ष होय म्हणुन देण्यात येतो.

**<u>मुददा कमांक 3 करिताः</u>**

26. वादींनी अतिक्रमीत क्षेत्राच्याबाबतीत दरम्यानच्या उत्पन्नाची मागणी केलेली आहे, परंतु नि. 01मध्ये वादीने त्यासंबंधी सवीस्तर असे कथन केलेले नाही व केलेले कथन मोघम स्वरूपाचे आहे. तसेच वादीने दिलेल्या पुराव्यामध्ये देखील दरम्यानचे उत्पन्नाबाबत नि. 01 प्रमाणे सांगीतलेले आहे व तो पुरावा देखील मोघम स्वरूपाचा आहे. वादींनी त्यांच्या कथनामध्ये व पुराव्यामध्ये प्रतिवादी अतिक्रमण केलेल्या क्षेत्रावर कोणती पिके घेत आहे व त्याला कोणत्या वर्षी कोणत्या पिकाचे किती उत्पन्न झालेले आहे या बाबत काही सांगीतलेले नाही. वादींनी दरम्यानच्या उत्पन्ना बाबत केलेली मागणी व दिलेला पुरावा दरम्यानचे उत्पन्न

मंजुर करण्यास व सिध्द करण्यास वादी अपयशी ठरले आहे व त्यांनी केलेल्या कथनावरून व दिलेल्या पुराव्यावरून वादी दरम्यानचे उत्पन्न मिळण्यास पात्र आहे, हे सिध्द न झाल्यामुळे व वरील कारणावरून वादी सिध्द करू न शकल्यामुळे मुद्दा क्र. 3 चा निष्कर्ष नाही म्हणुन देण्यात येतो.

**<u>मुददा क्रमांक 4 करिताः</u>**

27. मुद्दा क्र.1 ते 3 च्या निष्कर्षावरून व वादीने नि. 01 मध्ये केलेल्या प्रार्थनेप्रमाणे वादीचा दावा अशंतः मंजुर होण्यास पात्र आहे, म्हणुन हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

1. दावा अशंतः खर्चासह मंजुर करण्यात येतो.
2. वादी क्र. 1 च्या गट क्र. 119 मधील उत्तरेकडुन केलेल्या 0.03 आर या क्षेत्राचा ताबा वादी क्र. 1 ला या निकाला पासुन तिन महीण्याच्या आत प्रतिवादी याने दयावा, (मोजणी नकाशा नि.25 प्रमाणे) तसेच प्रतिवादी याने वादी क्र. 2 ला त्याच्या गट क्र. 119 मधील उत्तरेकडुन केलेल्या 0.01 आर या क्षेत्राचा ताबा वादी क्र. 2 ला या निकालापासुन तिन महीण्याच्या आत प्रतिवादी याने दयावा (मोजणी नकाशा नि. 25 प्रमाणे) असा आदेश प्रतिवादी विरूध्द देण्यात येतो. प्रतिवादीने आदेशाप्रमाणे अतिक्रमण केलेल्या जमीनीचा ताबा वादींना दिला नाही तर वादींनी दरखास्त दाखल करून जमीनीचा ताबा घ्यावा.
3. मोजणी नकाशा नि. 25 नि. 01 सोबत ठेवावा तसेच मोजणी नकाशा नि. 25 हुकुमनाम्याचा भाग म्हणुन वाचण्यात यावा.
4. वादींनी दरम्यानच्या उत्पन्नाबाबत केलेली मागणी नामंजुर करण्यात येते.
5. आदेशाप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.
6. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात श्रुतीलेखन करुन जाहीर करण्यात आला.

( **अजय द. पुंडलीक** )
दिवाणी न्यायाधिश क.स्तर, **पुर्णा**
जिल्हा परभणी.

दिनांक :— 25/01/2016